# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 24 February 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २४ फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेला सहा वर्षं पूर्ण–पंतप्रधानांच्या हस्ते १९वा हप्ता जारी
- महाराष्ट्र लवकरच देशाच्या एआय क्रांतीचे नेतृत्व करेल– मुख्यमंत्र्यांकडून विश्वास व्यक्त
- नवीन शैक्षणिक वर्षापासून "स्कूल बस" साठी नियमावली लागू केली जाणार

आणि

- छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचा बालस्नेही पुरस्कार जाहीर

****

शेतकऱ्यांना निधी आणि सन्मान देणाऱ्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेला सहा वर्षं पूर्ण झाली आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातल्या शेतकऱ्यांचं अभिनंदन केलं आहे. या योजनेतून आतापर्यंत साडेतीन लाख कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाल्याबद्दल पंतप्रधानांनी समाज माध्यमांवरच्या संदेशात समाधान व्यक्त केलं आहे.

दरम्यान, बिहारमध्ये भागलपूर इथं या योजनाचा १९वा हप्ता पंतप्रधानांच्या हस्ते आज जारी करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांना उद्देशून केलेल्या भाषणात पंतप्रधान म्हणाले –

***साथीयों, बीतें वर्षों मे सरकार की प्रयासों से भारत का कृषी निर्यात बहोत अधिक बढ गया है। इससे किसानों को उनकी उपज की ज्यादा किमत मिलने लगी है। कई कृषी उत्पाद ऐसे है, जिनका पहली बार निर्यात शुरू हुआ है। अब बारी बिहार के मखाना की है।***

पंतप्रधानांच्या हस्ते नऊ कोटी ८० लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २२ हजार ७०० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम आज जमा करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्रातल्या ९२ लाख ८९ हजार शेतकऱ्यांचा समावेश आहे. या योजनेच्या नागपुरात झालेल्या राज्यस्तरीय कार्यक्रमांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थितांना संबोधित केलं. केंद्र तसंच राज्य सरकार शेतकऱ्यांप्रति पूर्णपणे समर्पित असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून विदर्भातल्या दुष्काळी भागातली जमीन मोठ्या प्रमाणावर ओलिताखाली आणणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले –

***विदर्भातलं संपूर्ण चित्र बदलणार आहे. आपल्याला माहिती आहे की आपलं जे गोसीखूर्दचं धरण आहे, या धरणाच्या खालून शंभर टी एम सी पाणी हे वाहून समुद्रात जातं. ते कोणाच्याच कामी येत नाही. आपण आता ठरवलंय, की त्याचा एक नदीजोड प्रकल्प आपण करतोय. वैनगंगेचं हे पाणी बुलडाणाच्या नळगंगेपर्यंत आपण नेणार आहोत. म्हणजे पाचशे–साडेपाचशे किलोमीटरची एक नवीन नदी आपण तयार करतो आहोत. सगळा दुष्काळी भाग आपण याच्यामध्ये कव्हर करतो आहोत. जवळपास दहा लाख एकर जमीन ही पूर्णपणे त्याठिकाणी ओलिताखाली येणार आहे. ज्याच्यामुळे एक मोठं परिवर्तन या माध्यमातून होणार आहे.***

****

तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता–एआयच्या माध्यमातून राज्य शासनामार्फत प्रशासन आणि अर्थव्यवस्थेला गती देण्यात येत असून महाराष्ट्र राज्य लवकरच भारताच्या एआय आणि तंत्रज्ञान क्रांतीचे नेतृत्व करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. मुंबईत नॅसकॉम टेक्नॉलॉजी अँड लीडरशिप समिटमध्ये ते आज बोलत होते. देशातील ६० टक्के डेटा सेंटर्स महाराष्ट्रात आहेत. नवीन मुंबईत डेटा सेंटर पार्क उभारण्यात येत असून, २०३० पर्यंत राज्यातील ५०

टक्के वीजनिर्मिती हरित ऊर्जेवर आधारित असेल, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. 'ॲग्री–स्टॅट' उपक्रमाअंतर्गत संपूर्ण शेती प्रक्रियेचं डिजिटायझेशन करण्यात येत आहे. 'ड्रोन शक्ती' कार्यक्रमांतर्गत ड्रोन प्रशिक्षण देऊन कृषी फवारणी खर्च कमी करण्याचा मानस असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

****

सागरी सुरक्षा बळकट करण्यासोबतच मत्स्योत्पादनात वाढ करण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वाचा असल्याचं, मत्स्य व्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी म्हटलं आहे. किनाऱ्यांवरून होणारी घुसखोरी थांबवून सागरी सुरक्षा बळकट करणं तसंच सागरी आणि गोड्या पाण्यातील मत्स्योत्पादनात वाढ करण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर याविषयी राणे यांनी आज मंत्रालयातून देशभरातील एआय क्षेत्रात कार्यरत विद्यार्थ्यांशी संवाद साधला, राज्यातील एखाद्या जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर एआय तंत्रज्ञान आधारित विकास प्रकल्प राबवण्यात यावा आणि त्यातून होणाऱ्या फायद्यांचे एक रोल मॉडेल तयार करून संपूर्ण राज्यात त्याप्रमाणे योजना राबवण्यासंदर्भातली संकल्पना विद्यार्थ्यांनी यावेळी मांडली.

****

भारतामध्ये २०३६ पर्यंत उच्च शिक्षणासाठीच्या नोंदणीत ५०टक्के वाढ करण्याचं स्वप्न फक्त मुक्त आणि दूरस्थ शिक्षण क्षमतेचा वापर करूनच साकारता येईल, असं प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी केलं आहे. नाशिक इथं यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. देशातील शैक्षणिक प्रणाली लवकरच परीक्षा केंद्रित मॉडेलपासून परिणाम आधारित मॉडेलकडे संक्रमण करणार आहे. हा बदल विद्यार्थ्यांना अधिक रोजगारक्षम बनवण्याबरोबरच त्यांना उद्योजक होण्यासाठी सक्षम करेल असा विश्वास राज्यपालांनी व्यक्त केला.

या सोहळ्यात विद्यापीठातील ९६ शिक्षणक्रमांतील एक लाख ३९ हजार २१८ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येत असल्याचं, कुलसचिव दिलीप भरड यांनी कळवलं आहे.

****

दरम्यान, नाशिक इथं, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २४ वा दीक्षांत समारंभ आज कुलपती तथा राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि राष्ट्रीय आयुर्विज्ञान

आयोगाचे अध्यक्ष डॉ. बी. एन. गंगाधर या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

राज्यपालांनी यावेळी केलेल्या भाषणात, डॉक्टरांनी शासनाच्या आरोग्य खात्यात कामाचा अनुभव घेण्याचं आवाहन केलं. मंत्री हसन मुश्रीफ यांनीही वैद्यकीय क्षेत्रातल्या आव्हानांकडे लक्षे वेधत, डॉक्टरांनी गरीब रुग्णांची सेवा करावी, असं आवाहन केलं

****

नवीन शैक्षणिक वर्षापासून "स्कूल बसेस" साठी नियमावली लागू केली जाणार असून त्यासाठी निवृत्त परिवहन अधिकारी जितेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती नेमण्यात आली असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. मुंबईत आज परिवहन विभागामध्ये सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. या समितीला पुढील एक महिन्यांमध्ये या संदर्भातला अहवाल सादर करण्याच्या सरनाईक यांनी सूचना दिल्या आहेत.

****

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचा बालस्नेही पुरस्कार जाहीर झाला आहे. आयोगाच्या अध्यक्ष ॲड.सुशीबेन शाह यांनी एका पत्राद्वारे स्वामी यांची या पुरस्कारासाठी निवड झाल्याचं कळवलं आहे. येत्या ३ मार्चला मुंबईत एका सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान केला जाईल. स्वामी यांनी बालकांच्या हक्कांचे संरक्षण होण्याच्या दृष्टीने त्यांच्या प्रशासकीय कारकीर्दीत राबविलेल्या विविध उपक्रमांच्या यशस्वीतेमुळे त्यांची ह्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

****

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग इथले सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला अडीच महिन्याचा कालावधी उलटून गेला आहे. राज्य शासनाने या प्रकरणी विधीज्ञ उज्ज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुकी करावी आणि फरार कृष्णा आंधळेला तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी मस्साजोगचे ग्रामस्थ उद्यापासून अन्नत्याग आंदोलन करणार आहेत, संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशापुख यांनी ही माहिती दिली. मागण्या मान्य होईपर्यंत हे आंदोलन सुरु राहणार असल्याचं देशमुख यांनी सांगितलं.

दरम्यान, येत्या ८ मार्चला जागतिक महिला दिनाच्या औचित्याने काँग्रेस पक्षातर्फे मस्साजोग-बीड अशी सद्भावना यात्रा काढण्यात येणार आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. जवळपास ५१ किलोमीटरची ही यात्रा असून, नारायणगड आणि भगवानगड या दोन्ही गडावर जाऊन आम्ही सद्भावनेसाठी साकडे घालणार असल्याचं सपकाळ यांनी सांगितलं.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या "प्रशासन आपल्या मोबाईलवर" या नावीन्यपूर्ण उपक्रमास आजपासून सुरुवात करण्यात आली. शंभर दिवसाच्या सात कलमी कार्यक्रमांतर्गत हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. आजपासून शुक्रवार पर्यंत प्रत्यक्ष गुगल मीटद्वारे सरपंच, ग्रामसेवक यांच्यासोबत संवाद साधून पंचायत, जलजीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशन अंतर्गत त्यांच्या काही अडीअडचणी असल्यास त्यावर साधक बाधक चर्चा केली जाणार आहे.

****

काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी नरेंद्राचार्य महाराज यांच्याबद्दल अपमानास्पद विधान केल्याने बीडमध्ये आज नरेंद्राचार्य महाराजांच्या अनुयायांनी काळ्या फिती लावून निषेध मोर्चा काढत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन केलं. वडेट्टीवार यांनी नरेंद्र महाराजांची माफी मागावी अशी मागणी अनुयायांनी केली आहे.

छत्रपती संभाजीनगर इथंही क्रांतीचौक परिसरात नरेंद्र महाराजांच्या अनुयायांनी वडेट्टीवार यांच्या विरोधात आंदोलन करत, जोपर्यंत विजय वडेट्टीवार जाहीर माफी मागत नाही तोपर्यंत पुढेही आंदोलन सुरूच ठेवणार असल्याचं सांगितलं.

****

प्रयागराज इथल्या महाकुंभ मेळ्यासाठी छत्रपती संभाजीनगरच्या औरंगाबाद स्थानकावरुन औरंगाबाद-पाटणा-औरंगाबाद ही विशेष रेल्वेगाडी सोडण्यात येणार आहे. ही गाडी उद्या सायंकाळी साडे सात सुटून तिसऱ्या दिवशी सकाळी साडे दहा वाजता पाटण्याला पोहचेल. परतीच्या प्रवासात ही गाडी २७ फेब्रुवारीला याच मार्गे दुपारी साडे तीनला पाटण्याहून निघेल आणि १ मार्चला सकाळी पावणे आठला औरंगाबाद स्थानकावर पोहचेल.

****

आयसीसी अजिंक्यपद चषक क्रिकेट स्पर्धेत आज न्यूझीलंड आणि बांगलादेश संघात सामना सुरू आहे. न्यूझीलंड संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. अखेरचं वृत्त हाती आलं तेव्हा बांगलादेशच्या नऊ बाद २३६ धावा झाल्या होत्या.

****